CMYK

वंचितचे नेते सुजात आंबेडकर यांची आज जाहीर सभा >>पान 2

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार खा. संजय राऊत यांचा विश्वास >>पान 3

विविध संघटनांचा मविआचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना पाठिंबा >>पान 4

**सुविचार**
शांत मन आपल्याला खरे सुख मिळवून देते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 97 ■ शनिवार, दि. 16 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





अक्षय कुमार-प्रियांका चोप्राच्या 'ऐतराज'चा सिक्वेल झाला कन्फर्म, २० वर्षांनंतर दुसऱ्या भागाची घोषणा आतील पान

# नागपूर दक्षिणमध्ये राजकीय महाभारत; पुन्हा भाजपच्या मोहन मते विरुद्ध काँग्रेसचे गिरीश पांडव मैदानात

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरु झाली आहे. या निवडणुकांच्या अनुषंगाने जवळ जवळ सर्वच राजकीय नेते मैदानात उतरून आपल्या पक्षाचा आणि उमेदवारांचा प्रचार, प्रसार करत आहे. तर गल्लीपासून दिल्लीपर्यंत राजकीय मंडळी आपला अजेंडा मतदारराजाला पटवून देत मतांचा जोगवा मागत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, देशाच्या केंद्रस्थानी असलेल्या आणि राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर जिल्ह्यात यंदा कोणाची हवा असणार आहे, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. कारण राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते यंदा नागपूरच्या १२ मतदारसंघातून रिंगणात उतरून एकमेकांविरुद्ध आव्हान देत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागपूरच्या १२ मतदारसंघात महायुती की मविआ, या पैकी कोण बाजी मारणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

नागपूरच्या १२ मतदारसंघापैकी दक्षिण नागपूर मतदारसंघात यंदा 'काटे की टक्कर' बघायला मिळणार आहे. कारण गेल्या २०१९ च्या निवडणुकीत फक्त चार हजारांवर निकाल लागलेल्या या मतदारसंघात पुन्हा एकदा दोन्ही प्रमुख पक्षांकडून जुनेच सरदार लढाईच्या मैदानात उतरले आहेत. भाजपचे विद्यमान आमदार मोहन मते यांच्या विरोधात काँग्रेसने पुन्हा गिरीश पांडव यांच्यावर विश्वास दाखविला आहे.



मोहन मते हे उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे अत्यंत जिवलग मित्र आहेत, तर गिरीश पांडव हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विदर्भातील उजवे हात समजले जाणारे किरण पांडव यांचे बंधू आहेत. त्यामुळे दक्षिणच्या राजकीय महाभारतात मते आणि पांडव यांच्यात काट्याची लढाई होण्याची चिन्हे आहेत. या मतदारसंघावर भाजपचा दबदबा राहिला आहे. मात्र २०१४ मध्ये भाजपचे सुधाकर कोहळे जायंट किलर ठरले. त्यांनी काँग्रेसचे बडे नेते सतीश चतुर्वेदी यांना तब्बल ४३ हजार २१४ मतांनी मात दिली. पण २०१९ मध्ये भाजपने कोहळे यांचे तिकीट कापले आणि मोहन मते यांच्यावर विश्वास दाखविला. तर दुसरीकडे काँग्रेसने गिरीश पांडव यांना मैदानात उतरविले. त्यांना नाराज कोहळे समर्थकांची पडद्यामागून साथ मिळाली. प्रमोद मानमोडे, किशोर कुमेरिया, सतीश होले या आघाडीच्या नेत्यांच्या बंडखोरीनंतरही 'टफ' फाईट झाली. त्यामुळे मते हे फक्त ४०१३ मतांनी विजयी झाले.

लोकसभा निवडणुकी २०२४ च्या दक्षिण नागपुरात भाजप नेते नितीन गडकरी यांना २९ हजार ७१२ मतांची आघाडी मिळाली. आता अखेरच्या क्षणी भाजपने मास्टर कार्ड खेळत सुधाकर कोहळे यांना पश्चिम नागपुरात उमेदवारी दिली आणि कोहळे समर्थकांची नाराजी शमविण्याचा प्रयत्न केला. आघाडीत शिवसेनेच्या कोट्यात जात असलेली जागा कायम राखण्यसाठी काँग्रेस नेत्यांनीही मुंबई-दिल्लीत झुंज दिली. शेवटी पुन्हा एकदा गिरीश पांडव यांनाच गेल्या वेळची उरलेली लढाई पूर्ण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. विशेष म्हणजे यावेळी काँग्रेससह मित्रपक्षातूनही कुणी बंडखोरी केलेली नाही. त्यामुळे महाविकास आघाडी एकसंधपणे लढत असल्याचे चित्र आहे.

दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघात यंदा तांडव होईल आणि पांडव विजयी होईल असा दावा दक्षिण नागपूरचे काँग्रेस उमेदवार गिरीश पांडव यांनी केला आहे. देवा भाऊ (देवेंद्र फडणवीस) जरी दक्षिण नागपूरच्या भाजप उमेदवार मोहन मते च्या पाठीशी उभे असले तरी माझ्या पाठीशी कृष्णरुपी जनता आहे, आणि कृष्णेच्या सहाय्याने पांडवांचा विजय होईल असा विश्वास गिरीश पांडव यांनी व्यक्त केला आहे.

माझे सख्खे बंधू किरण पांडव हे मुख्यमंत्र्यांचे खास विश्वासू आहे, तरी त्यांच माझ्याशी रक्ताचा नातं आहे. त्यामुळेच ते महायुतीच्या प्रचारात दिसत नसावे. ते (मुख्यमंत्र्यांचे विश्वासू किरण पांडव) प्रत्यक्षपणे माझ्या प्रचारात नसले, तरी त्यांचा आशीर्वाद माझ्यासोबत आहे. दक्षिण नागपुरात आम्ही परिवर्तन घडवून दाखवू असा, दावाही गिरीश पांडव यांनी केला आहे.

दक्षिण नागपूर विधानसभा-२०१९
मोहन मते - भाजप ८४.३३९
गिरीश पांडव - काँग्रेस ८०,३२६
शंकर थूल - बसपा ५६६८
रमेश पिसे - वंचित
सतीश होले- अपक्ष ४६३१

दक्षिण नागपूर विधानसभा- २०१४
सुधाकर कोहळे- भाजप ८१,२२४
सतीश चतुर्वेदी काँग्रेस ३८,०१०
सत्यभामा लोखंडे - बसपा २३.१५६
शेखर सावरबांधे अपक्ष १५,१०७

## निवडणूक खर्चाविषयी तक्रारींसाठी निरीक्षक दानिश अब्दुल्ला, नवनीत कुमार यांना संपर्क करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगामार्फत दानिश अब्दुल्ला, नवनीत कुमार यांची निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक आचारसंहिता व खर्चाबाबत नागरिक, उमेदवार व राजकीय पक्षांना समस्या व तक्रारी असल्यास खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला यांना ७२७६१९१७६८ आणि नवनीत कुमार यांना ७६६६९४५६८१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## १० पैकी १० विकेट्स! अंशुल कंबोजचा रणजी स्पर्धेत विक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** रणजी करंडक स्पर्धेत हरयाणाकडून खेळणाऱ्या अंशुल कंबोजने एका डावात १० पैकी १० विकेट्स घेत नवा विक्रम रचला आहे. केरळ संघाविरुद्ध रोहतक सुरू असलेल्या लढतीत अंशुलने शॉन रॉजरला बाद करत डावातील सगळ्या विकेट्स पटकावण्याचा मान मिळवला. रणजी करंडक स्पर्धेत एका डावात १० विकेट्स घेणारा तो केवळ तिसरा गोलंदाज ठरला आहे. १९५६-५७ मध्ये प्रेमांग्सू चॅटर्जी यांनी तर प्रदीप सुदरमन यांनी १९८५-८६ मध्ये १० विकेट्स घेण्याची करामत केली होती.

भारतात प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये एका डावात १० पैकी १० विकेट्स पटकावण्याचा मान सुभाष गुप्ते, अनिल कुंबळे आणि देबाशीष मोहंती यांनी पटकावला होता. शुक्रवारी खेळ सुरू झाला तेव्हा विक्रमासाठी अंशुलला २ विकेट्सची आवश्यकता होती. तीन षटकात २ विकेट्स घेत अंशुलने दुर्मीळ विक्रम नावावर केला. ३०.१ षटकात ९ निर्धाव षटकांसह ४९ धावांच्या मोबदल्यात अंशुलने १० विकेट्स पटकावल्या. केरळ संघात बाबा अपराजित, रोहन कन्नूमल, सचिन बेबी, जलाज सक्सेना अशा अनुभवी फलंदाजांचा समावेश होता. पण अंशुलच्या भेदक माऱ्यासमोर केरळच्या सर्वच फलंदाजांनी शरणागती पत्करली. केरळतर्फे रोहन कन्नूमल (५५), अक्षय चंद्रन (५९), मोहम्मद अझरुद्दीन (५३) यांनी अर्धशतकी खेळी केली. केरळचा डाव २९१ धावात आटोपला.

२०२२ मध्ये अंशुलने हरयाणासाठी खेळायला सुरुवात केली. २०२३-२४ हंगामात विजय हजारे स्पर्धेत अंशुल हरयाणासाठी सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत अग्रस्थानी होता.

यंदाच्या वर्षीच अंशुलने आयपीएल स्पर्धेत पदार्पण केलं होतं. मुंबई इंडियन्स संघाने त्याला ताफ्यात समाविष्ट केलं होतं. दोन सामन्यात त्याला खेळायची संधी मिळाली. अंशुलने आपल्या गोलंदाजीने चाहत्यांना प्रभावित केलं होतं. ग्लेन मॅकग्रा हा अंशुलचा आदर्श आहे. हरयाणातलं करनाल हे अंशुलचं गाव. बॉक्सिंगपटूंसाठी हे गाव प्रसिद्ध आहे.

## उद्धव ठाकरेंच्या नाशिक दौऱ्याआधीच पोलिसांचा मोठा निर्णय; ठाकरे गटात प्रवेश करणाऱ्या बड्या नेत्यांना थेट तडीपारीची नोटीस

**नाशिक/प्रतिनिधी:** शहरात आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची सभा होणार आहे. मात्र या सभेच्या दरम्यान होणाऱ्या पक्षप्रवेशाच्या आधी नाशिक पोलिसांनी ठाकरे गटात प्रवेश करणाऱ्या राजकीय पदाधिकाऱ्यांवर हद्दपारीची कारवाई केली आहे. यामुळे उद्धव ठाकरेंच्या दौऱ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये राजकीय वातावरण तापल्याचे चित्र आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ३४८ सराईत गुन्हेगारांना पोलिसांकडून हद्दपारीची नोटीस बजावण्यात आली आहे. भाजपसह इतर पक्षातील पदाधिकाऱ्यांचा यात समावेश आहे. आज उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत भाजप आणि वंचित बहुजन आघाडीतून ठाकरे गटात प्रवेश करणाऱ्या विक्रम नागरे आणि पवन पवार यांनाही हद्दपारीची नोटीस बजावण्यात आली आहे. तर भाजप पदाधिकारी व्यंकटेश मोरेंचाही यात समावेश आहे. त्यातच काल नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार राहुल ढिकले आणि शरद पवार गटाचे उमेदवार गणेश गीते यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार बाचाबाची झाली होती. यानंतर पोलीस अक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळत आहे.

पोलीस दडपशाही करताय : सुधाकर बडगुजर

ठाकरे गटात प्रवेश करणाऱ्या नेत्यांवर हद्दपारीची नोटीस बजावण्यात आल्यानंतर नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे ठाकरे गटाचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांनी गंभीर आरोप केलेत. त्यांनी म्हटलंय की, निवडणूक आयोगाच्या नियमावली प्रमाणे निवडणूक ही फेअर झाली पाहिजे. शासनाच्या माध्यमातून पोलीस प्रशासन दडपशाही करत आहे.

## छत्रपती संभाजीनगरात सापडली सोन्या-चांदीनं भरलेली गाडी; तब्बल 'इतक्या' कोटींचं घबाड जप्त

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी:** : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं जिल्ह्यात येणाऱ्या आणि जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी केली जात आहे. यात राज्यात अनेक ठिकाणी निनावी रोकड निवडणूक आयोगानं जप्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील निल्लोड येथे निवडणूक आयोगाच्या पथकानं एका वाहनातून तब्बल १९ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने ताब्यात घेतले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हे दागिने जळगाव येथील एका सोने व्यापाऱ्याचे आहेत. त्याबाबत संबंधित व्यापाऱ्याला व्यवहाराचे तपशील घेऊन बोलावण्यात आलं आहे. त्यानंतर पुढील कारवाई होईल, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. १९ कोटींचे सोन्या-चांदीचे दागिने पकडले : निवडणुकीच्या काळात जिल्ह्यात येणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून चौकशी करण्यात येत आहे. जिल्ह्यात या अगोदर चाळीस लाखांची रोकड तपासणीत आढळून आली होती. त्यानंतर आता शहरातील जळगावकडं जाणाऱ्या एका गाडीमध्ये १९ कोटी रुपयांचे सोने चांदीचे दागिने आढळून आले आहेत. ही कारवाई गुरुवारी (१४ नोव्हेंबर) सायंकाळी निल्लोड येथे करण्यात आली. विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात सात ठिकाणी वाहन तपासणीसाठी स्थिर पथकांची स्थापना करण्यात आली आहे. यापैकी एक असलेल्या निल्लोड फाट्यावर असलेल्या सिल्लोड येथील स्थिर पथकाचे सहायक गटविकास अधिकारी दादाराव अहिरे, आर. पी. गावंडे, एस. एस. भालेराव, संतोष पवार, आदींनी संभाजीनगरकडून जळगावकडं जाणाऱ्या वाहनाची तपासणी केली असता त्यांना यात १९ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने सापडले.

## हिंदू भारत जोडो यात्रा, महाराष्ट्र जनजागृती रॅली



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : देव देश धर्म रक्षणासाठी आदिनाथ संप्रदायाकडून जम्मू काश्मीरच्या लाल चौकापासून कन्याकुमारीपर्यंत हिंदुत्वाचा प्रचारासाठी यात्रा काढली. हिंदू सभा जात जाती पातीमध्ये वाटला गेला आहे आमचा मुख्य उद्देश आहे जाती तोडू आणि हिंदू जोडू हा उद्देश घेऊन आम्ही ही हिंदू जनजागृती यात्रा काढली. अशी माहिती कल्कीराम महाराज यांनी दिली.




## श्रीमंत दगडूशेठ गणपतीला ५२१ पदार्थांचा महानैवेद्य आणि १ लाख २५ हजार दिव्यांची आरास


### त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आकर्षक सजावट

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** मिठाई, फराळाच्या तिखट-गोड पदार्थांपासून विविध प्रकारच्या फळांची करण्यात आलेली आकर्षक आरास आणि विविध रसास्वादाच्या तब्बल ५२१ प्रकारच्या पदार्थांचा नैवेद्य बाप्पाला अर्पण करण्यात आला आहे. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दगडूशेठ गणपती मंदिरात अन्नकोट आणि कळसापासून गाभाऱ्यापर्यंत सुमारे १ लाख २५ हजार दिव्यांनी संपूर्ण मंदिर सजविण्यात आले. पुणेकरांनी हे दृश्य डोळ्यामध्ये साठविण्यासोबतच मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद करण्यासाठी मोठी गर्दी केली आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दगडूशेठ गणपती मंदिरामध्ये दीपोत्सव आणि अन्नकोट आयोजित करण्यात आला होता. यावेळी ट्रस्टचे विश्र्वस्त, कार्यकर्ते उपस्थित होते. मंदिराच्या कळसासह संपूर्ण गाभाऱ्यात लावलेल्या पणत्यांनी मंदिराचा परिसर उजळून निघाला होता. याशिवाय तोरण आणि फुले, रांगोळ्यांनी मंदिराचा परिसर आकर्षक पद्धतीने सजविण्यात आला. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आयोजित अन्नकोटाकरीता पदार्थ देण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे भाविकांना करण्यात आले होते. त्यानुसार तब्बल ५२१ हून अधिक



प्रकारचे पदार्थ भाविकांकडून मंदिरात गोळा झाले. ते सर्व पदार्थ अन्नकोटामध्ये मांडण्यात आले. या सर्व पदार्थांचा प्रसाद मंदिरातील भक्तांना देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



CMYK

## भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची १५ नोव्हेंबर रोजी ४२ वी पुण्यतिथी होती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्र्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

# वंचितचे नेते सुजात आंबेडकर यांची आज जाहीर सभा

## मतदारांनी मोठ्या संख्येने रॅली व जाहीर सभेला उपस्थित राहा : डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांची डोणगाव येथील जुनी गुजरी जिल्हा परिषद कन्या शाळेसमोर दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता भव्य रॅली आयोजित करण्यात आली आहे. तसेच रात्री डोणगाव येथील जुनी गुजरी परिसरातील जिल्हा परिषद कन्या शाळेसमोर जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

या रॅलीला मतदारांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी केले आहे.



मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघ वंचित बहुजन आघाडीने डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या उमेदवारीने दमदार एन्ट्री केली आहे. त्यामुळे एरवी दुरंगी असणारी लढत वंचित बहुजन आघाडीच्या एट्रीने मात्र तिरंगी झाली आहे. वंचित बहुजन आघाडीला मतदार संघात सर्व स्तरातून उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून ग्रामीण भागात शहरात मतदार हे वंचित बहुजन आघाडीच्या



उमेदवाराला प्रचंड बहुमताने विजय करण्याचा निर्धार करीत प्रचारासाठी उतरले आहेत. कडाक्याची थंडी असताना सुद्धा मतदार रात्रचा दिवस करत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांना विजयी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

मेहकर लोणार मतदार संघात वंचित बहुजन आघाडीला मिळत असलेला प्रचंड पाठिंबा त्याचबरोबर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अड्.प्रकाश आंबेडकर यांनी सभा घेत वंचित बहुजन आघाडीच्या बाजुने संपूर्ण चित्र वळविले आहे. त्याचबरोबर आता वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर हे दि.१६ नोव्हेंबर रोजी डोणगाव येथील जुनी गुजरी परिसरातील जिल्हा परिषद कन्या शाळेसमोर आयोजित सभेला संबोधित करणार आहेत. त्याचबरोबर त्या अगोदर ते रॅलीमध्ये सुद्धा सहभागी होणार आहेत. तर नंतर वंचित बहुजन आघाडी उमेदवाराच्या प्रचारार्थ सभेला संबोधीत करणार आहेत.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या पाठोपाठ सुजात आंबेडकर यांची मतदारसंघात सभा होत असल्याने वंचित बहुजन आघाडीच्या बाजूने संपूर्ण प्रचार चे चित्र पालटले असल्याचे चित्र मतदार संघात दिसून येत आहे. आता वंचितचे नेते सुजात आंबेडकर यांची सभा आयोजित करण्यात आली असून या सभेला मेहकर लोणार मतदार संघातील मतदारांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी केले आहे.

# राजकीय पक्ष अन् उमेदवारांच्या जाहिरातींवर ठेवून आहे लक्ष; माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती कक्ष..!

भारत निवडणूक आयोगाकडील प्राप्त निर्देशानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची अधिसूचना निर्गमित होताच दि.१५ ऑक्टोबर २०२४ पासून संपूर्ण राज्यात व ठाणे जिल्ह्यातही आचारसंहिता लागू झाली आहे. त्यानुषंगाने जिल्हास्तरावर विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी दूरचित्रवाहिनी, रेडिओ, चित्रपटगृहे, सोशल मिडिया इत्यादी ठिकाणी प्रसारित करण्यात येणाऱ्या निवडणूक विषयक जाहिरातींच्या संदर्भात पूर्व प्रमाणपत्र देण्यासाठी व निवडणूकीतील पेड न्यूज पडताळणी करण्यासाठी माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (Media Certification and Monitoring Committee - MCMC) गठीत करण्यात येते. या लेखाच्या माध्यमातून जाणून घेवू, या माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज..




ठाणे जिल्ह्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे हे अध्यक्ष आहेत, तर ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी, राष्ट्रीय वृत्तसंस्था पीटीआय या वृत्तसंस्थेचे पत्रकार श्री.रामकृष्णन अय्यर, समाज माध्यम तज्ञ प्रसाद कुलकर्णी हे सदस्य तर जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

एम.सी.एम.सी.ची कर्तव्ये :-

या समितीमार्फत निवडणूकीतील विविध प्रकारच्या जाहिरातींवर लक्ष ठेवले जाते. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या प्रचाराशी संबंधित इतर माध्यमांमध्ये (प्रथित किंवा अप्रथित) राजकीय जाहिरातींचे खर्चाच्या अनुषंगाने देखरेख करणे, ज्यामध्ये उमेदवार, स्टार प्रचारक किंवा इतर व्यक्तींनी उमेदवाराच्या निवडणूक संधींवर परिणाम करण्यासाठी केलेली जाहिरात, प्रचार किंवा आवाहन यांचाही समावेश असेल.

प्रिंट मीडियामध्ये प्रकाशित कोणत्याही जाहिरातीचे निरीक्षण करणे, जर ती उमेदवाराच्या संमतीने किंवा माहितीने प्रकाशित केली असेल, तर ती उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट केली जाईल. तथापि, जर ती जाहिरात उमेदवाराच्या अधिकृततेशिवाय प्रकाशित केली असेल, तर प्रकाशकाविरुद्ध खझउ च्या १७१क कलमाचे उल्लंघन केल्याबद्दल खटला चालविण्यासाठी कारवाई केली जाऊ शकते.

आरपी ॲक्ट, १९५१ च्या कलम १२७- अंतर्गत निवडणूक पत्रक, पोस्टर, हँडबिल आणि इतर दस्तऐवजांवर प्रकाशक आणि मुद्रकाची नावे व पत्ते छापलेली आहेत का, याची तपासणी करणे.

प्रत्येक उमेदवाराच्या निवडणूक जाहिरातीवरील किंवा बातमी प्रकाशित करण्यासाठी केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या अनुषंगाने, प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाबाबत दैनिक अहवाल लेखा पथकाला सादर करणे, ज्याची प्रत निवडणूक निर्णय अधिकारी आणि खर्च निरीक्षकांना पाठविली जाते.

एमसीएमसीद्वारे पार पडणारे कार्य :-राजकीय जाहिरातींचे (छापील / व्हिडिओ / जिंगल्स / सोशल मीडिया रिल्स स्वरूपातील जाहिराती) पूर्व-प्रमाणीकरण.

पेड न्यूजच्या तक्रारी/मुद्यांची तपासणी करणे.

इलेक्ट्रॉनिक मीडियामधील राजकीय जाहिरातींवर लक्ष ठेवणे, जाहिरातींचे प्रसारण केवळ समितीच्या प्रमाणपत्रानंतरच झाले आहे, याची खात्री करणे.

जाहिरात पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे :

१.अर्जाचा फॉर्म

२.जाहिरातीत वापरलेली भाषा (जाहिरात दोन प्रतांसह इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर करावयाची आहे व त्यासोबत प्रमाणित केलेली ट्रान्सक्रिप्टही जोडणे आवश्यक आहे)

३.ऑडिओ तसेच व्हिडिओ जाहिरात पेन ड्राईव्हमध्ये द्यावी

४.सुचविलेल्या प्रसारणाचा अंदाजे खर्च व त्या प्रसारणातील विविध प्रसारणांची संख्या आणि दर यांचे विभाजन

५.प्रसारण कोठे करावयाचे आहे याबाबतचा खर्चाचा तपशील

६.मतदानाच्या दिवशी आणि मतदानपूर्व दिवशी वर्तमानपत्रात जाहिरातीचा मजकूर तपासणे अनिवार्य आहे.

ठाणे जिल्ह्याकरिता कार्यान्वित असलेल्या माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीने दि.१४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत १११ अर्जांचे प्रमाणिकरण पूर्ण केले आहे. यामध्ये ३२८ व्हिडिओ, ४६ ऑडिओ, १०६ डिजिटल पोस्टर, ५ पथनाट्य, २ आयविआर कॉल, १ टेक्स्ट एसएमएस व १ व्हॉट्सप मेसेज अशा ४८७ मजकूर प्रमाणित करून दिले आहेत.

मतदानपूर्व आणि मतदान दिवशीच्या जाहिरातींना 'एमसीएमसी'चे प्रमाणिकरण बंधनकारक

कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या दि.२० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच दि.१९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) यांच्याकडून पूर्व-प्रमाणित केली जात नाही तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करु नये. भारत निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे सर्व राजकीय पक्ष व त्यांच्या अधिकृत उमेदवारांनी काटेकोरपणे पालन करणे अपेक्षित आहे.



भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवसापूर्वी प्रिंट माध्यमांमधून कोणत्याही भडकावू, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये. ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला खीळ बसेल, अशा जाहिराती प्रकाशित होवू नयेत, याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

त्यामुळे कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या दि.२० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच दि.१९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात,जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व-प्रमाणित केली जात नाही, तसेच राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांना या कालावधीत प्रिंट माध्यमांमध्ये राजकीय जाहिरात द्यावयाची झाल्यास, अर्जदारांनी जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या दोन दिवस आधी माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (चउचउ) कडे जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे अर्ज करावा, अशा सूचनाही निवडणूक आयोगाकडून देण्यात आल्या आहेत.

दि.१३ ते २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत निवडणूक निकालाचे अंदाज प्रसारित करण्यास प्रसारमाध्यमांना प्रतिबंध

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने निवडणूक निकालाचे अंदाज (एुळीं झेश्रश्र) दि.१३ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.०० वाजेपासून ते दि.२० नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत प्रसारमाध्यमांवर प्रसारित करण्यास प्रतिबंध केल्याचे कळविले आहे. सर्व प्रसारमाध्यमांनी (प्रिंट मीडिया/ इलेक्ट्रॉनिक मीडिया/ सोशल मीडिया इत्यादी) या अधिसूचनेचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाने केले आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे
तथा नोडल अधिकारी, एकत्रित
मीडिया कक्ष आणि
सदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व
सनियंत्रण समिती, ठाणे

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707


हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार खा. संजय राऊत यांचा विश्वास

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी:** राज्यातील मतदारांचा महाविकास आघाडीला कौल आहे, त्यामुळे राज्यात कोणत्याही स्थितीत महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे, असा विश्वास खा. संजय राऊत यांनी व्यक्त केला. ते कोथरुड मतदार संघात धावत्या भेटी दरम्यान आले असता यावेळी प्रसार माध्यमांशी ते बोलत होते.

यावेळी राऊत पुढे म्हणाले की, भीती वाटणार्यांना उपद्याप करावे लागतात, अंगठ्या,पैसे वाटावे लागतात, परंतु, सगळ्यांना पुरून उरणारे उमेदवार हे चंद्रकांत मोकाटे आहेत. आम्ही शिवसेना,शरद पवार याचा पक्ष टिकवण्यासाठी संघर्ष केला, भले भले पळून गेले, त्यात चंद्रकांत मोकाटे मा राहिले आहेत. चंद्रकांत मोकाटे भूमिपुत्र आहेत, कोथरूडकरांनी भूमिपुत्राला निवडून द्यायचे की, बाहेरून आलेले पार्सल परत पाठवायचे हे ठरवायचे आहे. एकदा मोकाटे निवडून आले आहेत, ऐनवेळी तिकीट देण्यात आले,जेव्हा अस काही घडत तेव्हा मला वाटत तो उमेदवार १०० टक्के उमेदवार निवडून येतो, १७ तारखेला शेवटची सभा पुण्यात आहे. शेवटाची सभा घेतो तेव्हा विजय होतोच. तर येथील कोयता गँग आहेच, मारामारी करायला पाळलेली आहे, येथील पालकमंत्र्यांनी त्यांना सांगावे, आता काहीही केले तरी, राज्यात कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे, इकडची दुनिया तिकडे होईल पण मुख्यमंत्री महाविकास आघाडीचाच होईल, सरकारमध्ये पुण्याला स्थान मिळायचे असेल तर चंद्रकांत मोकाटे यांना निवडून द्या, असे आवाहन यावेळी खा.संजय राऊत यांनी केले. तसेच पुण्यात आपल्या वाट्याला कमी जागा आल्या आहेत. सिंहाचा वाटा शरद पवारांचा आहे. त्यानंतर काँग्रेसला जागा दिल्या आहेत. जेवढ्या जागा आम्हाला दिल्या त्यात स्ट्राइक रेट आमचा चांगला आहे, लोकांनी आता हा विचार केला पाहिजे, हक्काचा घरातला उमेदवार निवडून कोथरूडकरानी द्यावा, आम्हाला काही वाटावे लागणार नाही, याठिकाणी आमचा उमेदवार विजयी होऊन राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येईल, असा विश्र्वास यावेळी संजय राऊत यांनी व्यक्त केला.



## वंचितचे उमेदवार दिलीप राठोड यांच्या प्रचारार्थ सुजात आंबेडकर यांची सभा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी:** हदगाव मध्ये वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिलीप राठोड यांच्या प्रचारार्थ वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला तालुक्यातील वंचितचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने आले होते. मागासलेला, वंचित समाज आता पेटून उठला आहे कारण प्रस्थापित समाज आमच्या आरक्षणात येऊ पाहत आहे त्यामुळे हा समाज यावेळी क्रांती घडवणार अशी प्रतिक्रिया वंचितचे उमेदवार दिलीप राठोड यांनी दिली आहे.

## कुरळप पोलिसांनी वृध्द महिलेच्या गुंतागुंती खुनाच्या तपासाची चक्रे फिरवून आरोपीस ठोकल्या बेड्या

दैनिक आपला विदर्भ

**सांगली /प्रतिनिधी:** पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी कुरळप ता. वाळवा येथील इंदुबाई राजाराम पाटील वय ६५ हिचा दि. ७ रोजी कुरळप चांदोली वसाहत जवळील ऐतवडे खुर्द हद्दीतील उसाच्या शेतामध्ये पोटावरती विळ्याने वार करून खून करण्यात आला होता. दि ८रोजी सदर घटनेची फिर्याद कुरळप पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.



तेव्हा पासून आरोपीचा कुरळप पोलीस कसून तपास करत होते. मयत महिला ही शांत स्वभावाची व तिच्या कडे कोणतेही सोने नाणे किंवा प्रॉपर्टी नसल्याने हा खून कोणत्या कारणासाठी झाला असावा हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. यामुळे वरिष्ठ अधिकारी व इस्लामपूर उपविभागीय पोलीस अधिकारी मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रम पाटील यांनी वेगवेगळी पथके तयार करून मागील पाच दिवसापासून कसून शोध घेत होते. तर घटना घडले पासून संशयित म्हाकू दोडे हा ऐतवडे खुर्द गावातून गायब असल्याचे माहिती मिळाली होती.काल बुधवार दि १३ रोजी गोपनीय माहितीनुसार म्हाकू हा ऐतवडे खुर्द मध्ये आल्याची माहिती मिळाली यावरून तात्काळ कुरळप पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पाटील यांनी आपल्या पथका सह एतवडे खुर्द येथील स्मशानभूमी जवळ गेले असता एक व्यक्ती पोलिसांना पाहून पळून जात होता त्याला पकडून त्याच्याकडे चौकशी केली असता त्याचे नाव म्हाकू आनंदा दोडे असल्याचे सांगत खुणाची कबुली दिली मात्र काही गोष्टी तो लपवत असल्याने त्याला पोलीस स्टेशनला आणून पोलीस खाक्या दाखवताच त्याने मयत महिलेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न करत असताना महिलेने आरडा ओरडा करत प्रतिकार करत असल्याने तिचा खून केल्याची कबुली दिली.सदर कारवाई मध्ये सहायक पोलीस निरीक्षक विक्रम पाटील सहाय्यक पोलीस फौजदार राजेश जाधव पोलीस हवालदार कोळी पो. ह. जाधव पो. नाईक देसाई,पो कॉ. सलमान मुलाणी, राहुल पाटील,पो. कॉ.धोत्रे यांनी सहभाग घेतला.

## निवडणुकीच्या काळात प्राणघातक हल्ले होतात हे चुकीचे

### भाजप नेत्या तथा आ. पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला संताप

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक /प्रतिनिधी:** निवडणुकीच्या काळात प्राणघातक हल्ले होतात, हे अत्यंत चुकीचे आहे, हा प्रकार अत्यंत गंभीर आहे, असा संताप भाजप नेत्या तथा आ. पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.तर याबाबत भरारी पथकाने लक्ष द्यावे, अशी मागणी केली. त्या नाशिक येथे प्रचार सभेत दि.१५ नोव्हेंबर रोजी बोलत होत्या. नाशिक येथे भाजप नेत्या तथा आमदार पंकजा मुंडे यांची सभा सुरु असताना पक्षाच्या काही पदधिकाऱ्यांना माहिती मिळाली विरोधकांकडून पैसे वाटप होत आहेत. या कारणावरून वाद होऊन दोन्ही गटात मारामारी झाली. यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना भाजप नेत्या तथा आ. पंकजा मुंडे यांनी ही घटना गंभीर,अशी गुंडगिरी चालणार नाही, ही घटना निंदनीय असून प्राणघातक हल्ला झाला,यावर पोलिसांनी लक्ष घालावे, अशी मागणी सुद्धा पंकजा मुंडे यांनी केली, तसेच एक महिला उमेदवार असताना ही घटना घडली त्याचा निषेध केला. तर प्राणघातक हल्ला केला त्याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चौकशी सुरू केली आहे. ही निवडणूक सुरू असताना अशा घटना घडत असून भरारी पथकांनी बॅगा तपसातानी अशा घटनांकडेही लक्ष द्यावे, अशी मागणी मुंडे यांनी केली. त्याचबरोबर या प्रकाराबाबत मी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असून बॉगा तपासल्या पाहिजे पण अशा गोष्टींवर देखील लक्ष दिले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला झाला, त्यांच्याही कार्यकर्त्यांवर हल्ले झाले पण सध्या आचारसंहिता चालू आहे, आमची निवडणुकी विकासावर सुरू आहे, आमचे संस्कार हे जातीवर निवडणूक लढवणे नाही, असा टोलाही भाजप नेत्या तथा आ. पंजका मुंडे यांनी विरोधकांना लगावला.



## महत्त्वाचे...

### खा.श्रीकांत शिंदे यांच्या बॅगांची तपासणी





दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी:** शिंदे गटाचे उमेदवार आनंद भरोसे यांच्या प्रचारान्थ खा.श्रीकांत शिंदे हे परभणी येथे आले असता भरारी पथकाच्या वतीने खा.श्रीकांत शिंदे यांच्या बॉगांची तपासणी करण्यात आली. हा प्रकार दि.१५ नोव्हेंबर रोजी परभणी येथे घडला. शिंदे गटाचे उमेदवार आनंद भरोसे यांच्या प्रचारासाठी खा. श्रीकांत शिंदे परभणी येथे आले असता त्यांचे हेलिकॉप्टर येथील पोलीस हेड कार्टर येथील हेलिपॅड येथे लँड होताच लगेच भरारी पथकाच्या वतीने खा.श्रीकांत शिंदे यांच्या बॅगांची तपासणी केली. गत काही दिवसापूर्वी माजी मुख्यमंत्री तथा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बॅगांची यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे तपासणी केली होती. नंतर प्रचारासाठी येणार्या इतर नेत्यांची सुद्धा भरारी पथकाच्या वतीने हेलिपॅडवर तपासणी करून आदर्श आचारसंहिते दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी घेतली जात आहे. मात्र आतापर्यंत कोणत्याही नेत्यांच्या बॉगांमध्ये कोणतेही रोकड मिळाली नाही, तसेच इतर कोणताही संशायास्पद वस्तू सुद्धा मिळून आल्या नाहीत. निवडणुकीच्या काळात नियुक्त पथकाच्या वतीने मात्र काळजी घेतली जात आहे.

### टपाली मतपत्रिकेचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल प्रकरणी गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** पोलीस शिपाई गणेश अशोक शिंदे यांनी २३१-आष्टी विधानसभा मतदार संघ, जिल्हा बीड या मतदार संघासाठी टपाली मतपत्रिकेव्दारे मत नोंदविल्यानंतर, त्यांच्या भ्रमणध्वनीमध्ये मतपत्रिकेचा फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केला. टपाली मतपत्रिकेचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्यामुळे कायदेशीर आदेशाची अवज्ञा केली तसेच मतदानाची गोपनियता भंग केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती १८५ मलबार हिल विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब वाकचौरे यांनी दिली.

मलबार हिल मतदार संघात विल्सन महाविद्यालय, नेताजी सुभाषचंद्र रोड, गिरगाव चौपाटी, चर्नीरोड मुंबई येथे पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी टपाली मतदानासाठी फॅसिलिटेशन सेंटर तयार करण्यात आले आहे. या सेंटर मधील मतदान केंद्र क्रमांक ३ वर सदर घटना घडली आहे. सर्व मतदारांना मतदान केंद्रावर भ्रमणध्वनी वापरण्यास पुर्णपणे बंदी असल्याबाबत तसेच मतदारांनी त्यांचे मतदान करीत असताना पुर्णतः गोपनियता बाळगून, मतदान करावे व मतदान पुर्ण केल्यानंतर, बॅलेट मतपत्रिका व १३ए फॉर्म हा त्यासोबत असलेल्या लिफाफ्यात भरुन सदरचा लिफाफा बंद अवस्थेत केवळ मतदान कक्षात ठेवलेल्या मतदान पेटीत टाकण्याबाबत सुचित केले होते, अशी माहिती मतदान केंद्राध्यक्ष प्रसन्न मधुसुदन तांबे यांनी दिली.

पोलीस शिपाई गणेश अशोक शिंदे यांनी मतपत्रिकेची गोपनीयता भंग केल्याप्रकरणी गावदेवी पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### जामनेर शहरातून तब्बल १७ लाखांची रोकड जप्त

**जळगाव/प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील जामनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीतून तब्बल १७ लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक मुरलीधर कासार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार जामनेर मधील बोदवड चौफुली येथे पाचोरा येथील दोन व्यापारी गुजरात येथून ही रक्कम आणत असताना ही रोकड जप्त करण्यात आली आहे. एकूण १७ लाख २४ हजार ८०० रुपयांची ही रोकड जामनेर पोलिसांनी जप्त करत निवडणूक आयोगाला हस्तांतरित केली आहे. यापुढील सर्व बाबी तपासून संबंधित रक्कम व्यापाऱ्यांना पुरावे दाखविल्यानंतर परत केली जाईल अशी माहिती मुरलीधर कासार यांनी दिली आहे. सदरची रोख रक्कम ही प्रकाश समाधान पाटील आणि नवाब अकबर पठाण यांची असून ही रक्कम कापसाची असल्याचं त्यांचं म्हणणं आहे.



### दिलजीत दोसांझला दिल लुमिनाटी कॉन्सर्टपूर्वी तेलंगणा सरकारकडून मिळाली नोटीस

हैदराबाद: तेलंगणा सरकारनं पंजाबी गायक आणि अभिनेता दिलजीत दोसांझला कॉन्सर्ट आता नोटीस पाठवली आहे. दिलजीतचा दिल लुमिनाटी कॉन्सर्ट शुक्रवारी हैदराबादमध्ये होणार आहे. शुक्रवारी हैदराबादमध्ये त्याच्या दिल-लुमिनाटी कॉन्सर्टच्या आधी ही नोटीस आल्यानं त्याच्या चाहत्यांमध्ये आता चिंता व्यक्ती केली जात आहे. दरम्यान या नोटीसमध्ये अल्कोहोल, ड्रग्स आणि हिंसेला प्रोत्साहन देणारी गाणी न गाण्याचे निर्देश दिले आहेत. चंदीगडमधील एका रहिवाशाच्या तक्रारीनंतर ही नोटीस देण्यात आली आहे. याशिवाय दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये किशोरवयीन मुलांचा एंट्री न देण्याचे देखील निर्देश दिले आहेत. तेलंगणाच्या महिला आणि बालविकास विभागाच्या आयुक्त कांथी वेस्ले यांनी दिलजीत दोसांझ आणि इव्हेंट आयोजक दोघांनाही इशारा दिला आहे.तेलंगणा सरकारनं दिलजीत दोसांझला पाठवली नोटीस : गेल्या महिन्यात, दिलजीत दोसांझनं नवी दिल्लीतील लाइव्ह शोमध्ये अल्कोहोल, ड्रग्स आणि हिंसेला प्रोत्साहन देणारी गाणी गायल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यानंतर त्याला अनेक यूजर्सनं ट्रोल केलं होतं. आता पुन्हा हैदराबादमध्ये हेच चित्रपट पाहायला मिळेल, त्यामुळे आधीच या सर्व गोष्टींवर लक्ष देण्यात आलं आहे. दिलजीत हैदराबादला पोहोचला असून त्यानं १४ नोव्हेंबर रोजी ऐतिहासिक चारमीनारला भेट दिली. याशिवाय त्यानं मंदिर आणि गुरुद्वारामध्ये प्रार्थना केल्याचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर शेअर केला. त्यानं सोशल मीडियावर शेअर केलेला हा व्हिडिओ अनेकांना आवडत आहे.

दिलजीत दोसांझचा दिल-लुमिनाटी कॉन्सर्ट : हैदराबादमधील दोसांझचा कॉन्सर्ट हा त्याच्या दिल-लुमिनाटी टूरचा एक भाग आहे, जो भारतातील अनेक शहरांमध्ये आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान ही नोटीस तेलंगणातील रंगारेड्डी शहरातील महिला आणि बालकल्याण विभाग, अपंग आणि ज्येष्ठ नागरिक कल्याण विभागाचे जिल्हा कल्याण अधिकारी यांनी जारी केली आहे.


# विविध संघटनांचा मविआचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना पाठिंबा

## शेकडो कार्यकर्त्यांनी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत केला प्रवेश

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** मेहकर लोणार विधानसभा मतदार संघाचे उमेदवार सिद्धाऱ्थ खरात यांच्या कार्यकऱ्तुत्वार विश्र्वास ठेऊन मतदार संघातील आदीवासी समाज बांधवानी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत जाहीर प्रवेश करून जाहीर पाठिंबा दिला. तर, यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी आदीवासी समाजबांधवांनी आपल्यावर ठेवलेल्या विश्र्वासाला तडे न जाऊ देता या समाजाच्या सर्वांगिण विकासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही यावेळी दिली.

मेहकर लोणार मतदार संघाला महाविकास आघाडीकडून पहिल्यांदाच उच्च विद्याविभूषित व प्रशासकीय अधिकारी पदाचा प्रदीर्घ अनुभव असलेले सिद्धार्थ रामभाऊ खरात यांना उमेदवारी दिली आहे. एक उच्च विद्याविभूषीत व्यक्तीमत्व असलेले सिद्धाऱ्थ खरात यांच्यावर विश्र्वास ठेऊन शेकडो आदीवासी समाज बांधवांनी दि.१५ नोव्हेंबर २०२४ रोजी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करून खरात यांना जाहीर पाठिंबा दिला. यावेळी सिद्धार्थ खरात व भाई अशांत वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पंकज वाघ, साक्षी राजेश भोसले, अशोक शिंदे, बबन पवार, अतुल प्रल्हाद भोसले, भीमराव सरदार, राहुल भोसले, सुमेध अवसरमोल, निलेश पवार, लक्ष्मण मुळे, मंगेश वानखेडे, इन्कलाब भोसले, मनोहर वाघ, बिरसा क्रांती दल हरिदास मिरगे, रवी धंदरे, संतोष जटाळे, योगिता आकाश शिंदे, चंदा राहुल भोसले, संगीता शिंदे, जयश्री शिंदे, रेखा शिंदे, शर्मा भोसले, प्रवीण शिंदे, आकाश शिंदे, उषा भोसले, सुरेश शिंदे यासह शेकडो समाज बांधवांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश करून पाठिंबा दिला. तर यावेळी



उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांनी आपण नोकरीचा राजीनामा देऊन सामाजिक उन्नतीसाठी, मेहकर लोणार तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले असल्याचे सांगून मतदार संघातील सर्व घटकांचा विकास करण्याला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले.

तसेच शेतकर्यांच्या सोयाबीला ८ हजार रुपये व कापसाला १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव देऊन, महिलांना सुरक्षा, शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना जशी आहे, तशी सुरु करण्यासाठी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही दिली. त्यामुळे मेहकर लोणार तालुक्यातील तरुणांना, व्यापाऱ्यासह नागरिकांना गुंडशाही, दडपशाहीच्या बाहेर काढायचे आहे, त्यासाठी अनेक सामाजिक संघटना एकत्र येऊन सिद्धार्थ खरात यांच्यावर विश्र्वास ठेऊन महविकास आघाडीला पाठिंबा देत आहेत.

## विविध वृत्त...

### उद्धव ठाकरे स्वत:ला कायद्यापेक्षा मोठे समजत असतील; ॲड. प्रकाश आंबेडकर यांची उद्धव ठाकरे यांच्यावर टीका



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** कायदा हा सऱ्वांसाठी सारखाच आहे, त्यामुळे नियमाने कोणातीही बॅग तपासण्याचा अधिकार आहे. स्वत:ला कायद्याच्या वर कोणी समजू नये, उद्धव ठाकरे स्वत:ला कायद्यापेक्षा मोठे समजत असतील, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे सऱ्वेसऱ्वा अड्. प्रकाश आंबेडकर यांनी केली. ते दि.१५ नोव्हेंबर रोजी बुलढाणा येथे प्रसार माध्यमांशी बोलत होते. यावेळी अड्.प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, स्वत:चा पाच वर्षांच्या कालखंडात लपविण्याचा प्रयत्न सुरु आहे, सर्व मुस्लिम बांधवांना सांगणार आहे की, वंचित बहुजन आघाडीला मत द्या, नुपूर शर्मा यांनी मोहम्मद पैगंबर विरुद्ध अपशब्द लिहिला. त्यावेळी पोलीसांनी सांगितले की असा काही कायदा नाही, मुस्लिम बांधवांनी काँग्रेस व भाजपचे राज्य बघितले आहे. कायदा आलेला नाही, मुस्लिम बांधवांनी वंचित बहुजन आघाडीला निवडून आणावे आम्ही त्यावर कायदा आणू असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.तर नियम सऱ्वांसाठी आहेत. नियमात कोणाचीही बॅग तपासण्याचा अधिकार आहे. स्वतःला कायद्याच्या वर कोणी समजू नये, कायद्यासमोर सगळे सारखेच आहेत.परंतु, उद्धव ठाकरे स्वतः ला कायद्यापेक्षा मोठे समजत असतील, असा टोला वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.

### अक्षय कुमार-प्रियांका चोप्राच्या 'ऐतराज'चा सिक्वेल झाला कन्फर्म, २० वर्षांनंतर दुसऱ्या भागाची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी:** अक्षय कुमार, प्रियांका चोप्रा आणि करीना कपूर खान यांच्या 'ऐतराज' या चित्रपटाचा सिक्वेल येणार आहे. काल या चित्रपटाच्या प्रदर्शनाला २० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने स्वतः चित्रपट निर्माते सुभाष घई यांनी 'ऐतराज २'ला दुजोरा दिला आहे. २० वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला 'ऐतराज' हा चित्रपट अतिशय बोल्ड विषयावर आधारित होता, जो लोकांना खूप आवडला होता. या चित्रपटामुळे प्रियांका चोप्राचे नशीबही उजळले. २००४ मध्ये रिलीज झालेल्या ऐतराजची निर्मिती सुभाष घई यांनी केली होती. चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी अब्बास-मस्तान या जोडीवर देण्यात आली होती. मात्र आता दुसऱ्या भागासाठी दिग्दर्शक बदलण्यात आला आहे. हिंदुस्तान टाईम्सच्या रिपोर्टनुसार, हा चित्रपट ओ माय गॉड २ चे लेखक आणि दिग्दर्शक अमित राय दिग्दर्शित करणार आहेत. खुद्द सुभाष घई यांनी ही माहिती दिली आहे. सुभाष घई म्हणाले, मी OMG २ चे लेखक आणि दिग्दर्शक अमित राय यांच्याकडून एक अतिशय उत्कृष्ट स्क्रिप्ट ऐकली आहे. ती ऐतराज २ साठी लिहिली आहे. हा चित्रपट बनवण्यासाठी आम्हाला अनेक स्टुडिओमधून फोन येत होते. पण यावेळी अमितकडे पुन्हा एकदा मोठी हिट स्क्रिप्ट आहे, असेच म्हणावे लागेल. मला ती स्क्रिप्ट खूप आवडली. चित्रपटाची कथा आधीच्या चित्रपटासारखीच असेल का? या प्रश्नावर सुभाष घई म्हणाले, ही कथा अमित राय यांची आहे. आजच्या लैंगिक जीवनावर त्यांनी आणखी एका बोल्ड मुद्द्यावर स्क्रिप्ट लिहिली आहे, ज्यामध्ये नवीन मूल्ये आणि नवीन विचारधारा उदयास येत आहेत. यातून केवळ सोशल ड्रामाची अपेक्षा करता येणार नाही. त्यात काही खूप मजबूत आणि उच्च नोट्स असाव्यात. चित्रपट सुरू करण्यासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत.ऐतराजमध्ये प्रियांका चोप्राने सोनिया रॉयची भूमिका साकारली होती. या चित्रपटात तिने साकारलेल्या व्यक्तिरेखेची खूप प्रशंसा झाली होती. आता ऐतराज २ मध्ये महिला लीड कोण असेल हा प्रश्न आहे.

## भगवान बिरसा मुंडा यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**बुलढाणा/प्रतिनिधी:** भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### पीएमसी बँक घोटाळा; पीडित खातेधारकांच्या याचिकांवर १२ डिसेंबरला सुनावणी

**मुंबई/प्रतिनिधी:** बुडीत गेलेल्या पंजाब आणि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँकेत पाच लाखांपेक्षा अधिक रक्कम ठेवीच्या स्वरुपात असलेले खातेदार गेली पाच वर्षे ही रक्कम मिळावी म्हणून झगडत असून अखेर दोन वर्षांपूर्वी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या विविध याचिकांवर गुरुवारी एकत्रित सुनावणी होणार होती. मात्र ही सुनावणी आता १२ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

या घोटाळ्यामुळे ३०० हून अधिक वयोवृद्ध खातेदारांचा मृत्यू झाला तर तिघांनी आत्महत्येचा मार्ग पत्करला. आपली हक्काची गुंतवणूक परत मिळावी, यासाठी ३८ हजारांहून अधिक खातेदार प्रयत्नशील असून यामध्ये २० हजारांहून अधिक वयोवृद्ध खातेदारांचा समावेश आहे. पीडित खातेदारांच्या एकत्रित याचिकांवर न्या. ए. एस. चांदूरकर आणि न्या. राजेश पाटील यांच्या खंडपीठासम ोर आता १२ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

### बागलाणमध्ये दिलीप बोरसेंसमोर दीपिका चव्हाणांचं तगडं आव्हान, कोण उधळणार विजयाचा गुलाल?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरु झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यात एकाचा टप्प्यात निवडणूक पार पडणार आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. नाशिकच्या बागलाण विधानसभा मतदारसंघात महायुतीत भाजपने पुन्हा एकदा विद्यमान आमदार दिलीप बोरसे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. तर त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने दीपिका चव्हाण यांना उमेदवारी दिली आहे. बागलाणमध्ये दिलीप बोरसे विरुद्ध दीपिका चव्हाण यांच्यात थेट लढत होणार असून या निवडणुकीत कोण बाजी मारणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

बागलाण मतदार संघ हा चाळीस वर्षापूर्वी अनुसूचित जमातीसाठी राखीव झाला आणि त्यानंतर या मतदार संघात बोरसे आणि चव्हाण या दोन कुटुंबातील सदस्यांमधील उमेदवार निवडणुकीत विजयी होत आले. बागलाण विधानसभा मतदारसंघात सुमारे ४० टक्के आदिवासी जनता आहे. दलित समाजाचा व्होटर शेअर सुमारे पाच टक्के आहे. मुस्लिम समुदायाचा सुमारे २.५ टक्के आहे. शहरी आणि ग्रामीण मतदारांची स्थिती पाहिल्यास, ९० टक्के ग्रामीण आणि १० टक्के शहरी मतदार आहेत.

सध्या बागलाण विधानसभा म तदारसंघ सध्या भाजपच्या दिलीप मंगळू बोरसे यांच्या ताब्यात आहे. यापूर्वी या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीपिका चव्हाण यांचा कब्जा होता. २००९ मध्ये उमाजी मंगळू बोरसे यांनी या विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला होता. या मतदारसंघाची स्थापना झाल्यापासून १९६२ ते १९९० पर्यंत हा मतदारसंघ काँग्रेसचा गड मानला जात होता. २०१९ च्या निवडणुकीत भाजपच्या दिलीप बोरसे यांनी दीपिका चव्हाण यांचा पराभव केला होता. दिलीप बोरसे यांना ९४,६८३ मतं मिळाली होती, तर दीपिका चव्हाण यांना ६०,९८९ मतं मि ळाली. भाजपच्या दिलीप बोरसे यांनी मोठ्या मतांच्या फरकाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीपिका यांना पराभूत केले होते. यंदा पुन्हा एकदा दिलीप बोरसे आणि दीपिका चव्हाण यांच्यात लढत होणार आहे.

### उबाठाच्या जाहीरनाम्यातील आश्वासनावर राज ठाकरेंनी बोट ठेवलं, म्हणाले, 'शिवाजी महारांजांची मंदिरं सगळीकडे नकोत....'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी शुक्रवारी मुंबईत आपल्या पक्षाचा विधानसभा निवडणुकीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. 'आम्ही हे करु' या नावाने हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. या जाहीरनाम्यात चार प्रमुख भाग आहे. यापैकी पहिल्या भागात मुलभूत गरजा आणि जीवनमान, दुसऱ्या भागात दळवळण, तिसऱ्या भागात औद्योगिक धोरण आणि चौथ्या भागात मराठी अस्मिता अशा मुद्द्यांचा समावेश आहे. जाहीरनामा प्रसिद्ध करण्याच्या कार्यक्रमात राज ठाकरे यांनी 'लाडकी बहीण योजना' आणि उद्धव ठाकरे यांच्या राज्यभरात शिवाजी महाराजांची मंदिरं उभी करण्याच्या आश्वासनाबाबत टिप्पणी केली.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात राज्यभरात शिवाजी महाराजांची मंदिरं उभी करणार, असे म्हटले आहे. पण त्याऐवजी राज्यात विद्यामंदिरं उभी करणे महत्त्वाचे आहे आणि राज्यातील गडकिल्ल्यांचे संवर्धन केले पाहिजे. महाराष्ट्रात चौकाचौकात शिवाजी महाराजांचे पुतळे आहेत. मग शिवाजी महाराजांच्या मंदिरांची गरज काय? त्याऐवजी राज्यातील मुलांना शिक्षण मिळणे महत्त्वाचे आहे आणि शिवरायांनी उभारलेले गडकिल्ले चांगले होणे महत्त्वाचे आहे, असे मत राज ठाकरे यांनी व्यक्त केले.



तसेच मनसेच्या जाहीरनाम्यात 'लाडकी बहीण योजना' किंवा 'महालक्ष्मी योजना' यासारख्या योजनांचा समावेश का नाही, असा प्रश्न राज ठाकरे यांना विचारण्यात आला. त्यावर राज ठाकरे यांनी म्हटले की, याचं कारण महाराष्ट्राचं एकूण आर्थिक गणित पाहिल्याशिवाय मी असल्या घोषणा करु शकत नाही. असल्या घोषणांना अर्थ नसतो. महाराष्ट्रावर आर्थिक बोजा न येता या योजना सुरु राहिल्या तर मी त्याला गिफ्ट म्हणेन. पण उद्या या गोष्टी सुरु राहिल्या नाहीत तर मी या योजनांना लाच म्हणेल. अशा योजना सुरु करताना राज्याचा आर्थिक ढाचा बिघडता कामा नये. सरकारकडून महिलांना पैसे मिळतात, याचा आनंदच आहे. पण या सगळ्यातून आपण काही वेगळे खड्डे तर खणून ठेवत नाही ना, हेदेखील तपासले पाहिजे, असे राज ठाकरे यांनी म्हटले.

राज ठाकरे यांनी १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्कवर सभा घेण्यासाठी अर्ज केला होता. मात्र, त्यांना अद्याप या सभेसाठी परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे राज ठाकरे यांनी शिवाजी पार्कवरील सभा रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्याऐवजी मी मुंबई आणि ठाण्याच प्रचार करेन, असे राज ठाकरे यांनी म्हटले.

## मतदान,मतदानाच्या पूर्वीच्या दिवशी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे पूर्वप्रमाणिकरण आवश्यक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणिकरण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील सात मतदार संघासाठी माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील हे आहेत. निवडणूक विषयक सर्व राजकीय जाहिरातींचे तसेच मुद्रीत माध्यमाव्दारे मतदान आणि मतदानाच्या पूर्वीच्या दिवशी प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे पूर्व प्रमाणिकरण करणे आवश्यक असल्याचे डॉ. पाटील यांनी कळविले आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्ह्यात दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यानुसार दि. १९ व २० नोव्हेंबर रोजी वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती पूर्वप्रमाणित करून घ्याव्या लागणार आहेत. पूर्व-प्रमाणीकरणासाठी समितीकडे तीन दिवस आधी अर्ज सादर करावा लागतो. प्रमाणीकरणासाठी भूसंपादन इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे माध्यम कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, उमेदवार व राजकीय पक्षांनी आपल्या जाहिरातींचे प्रमाणिकरण करुन घेण्यासाठी आपले अर्ज दिलेल्या मुदतीत माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडे सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

